साप्ताहिक
# विश्वनायक
Email: vishvanayak94@gmail.com
● संपादक : बिलाल शेख ●
VISHVANAYAK
Mo.8686888898

■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - २८ ■ मंगळवार दि.०७ जुलै २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 28 ■ Tuesday Dt. 07 Jully 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

## आर्वीत तरुणावर लोखंडी कात्रीने जीवघेणा हल्ला

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील आर्वी गावात मजूर सोबत नेण्याच्या जुन्या वादातून एका तरुणावर लोखंडी कात्रीने अमानुष आणि जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्राणघातक हल्ल्यात संबंधित तरुण गंभीर जखमी झाला असून त्याचा एक दात पडला आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी युवराज बारीकराव मांडवे (वय २८ वर्षे, व्यवसाय फरशी मिस्तरी व शेती, राहणार आर्वी, तालुका शिरूर कासार) हे ३ जुलै २०२६ रोजी सकाळी गावातील एका हार्डवेअरच्या दुकानात साहित्य खरेदी करण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथे आलेल्या तुषार बबन मंडलीक (वय ३५ वर्षे, राहणार आर्वी) याने आमच्या पाहुण्याला कामावर का घेऊन जातोस, असे म्हणून वाद घालण्यास सुरुवात केली. फिर्यादीने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने दुकानात पडलेली लोखंडी पत्रे कापण्याची मोठी कात्री उचलली आणि जिवे मारण्याच्या उद्देशाने युवराज यांच्या डोक्यात, मानेवर आणि तोंडावर सपासप वार केले. या हल्ल्यात युवराज यांचा वरचा दात जागीच पडला आणि खालचा दात हिरडीतून तुटला.

गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडलेल्या युवराज यांना नातेवाईकांनी उपचारासाठी बीड येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले होते. रुग्णालयातून सुटी मिळाल्यानंतर फिर्यादीने पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी तुषार बबन मंडलीकविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी करीत आहेत.

# कर्करोग औषध धोरणावर प्रश्नचिन्ह!

## आधी स्वस्ताईचा गाजावाजा, आता दरवाढीला सरकारची मंजुरी

**मुंबई । विश्वनायक न्यूज**

देशभरातील हजारो कर्करुग्णांना अत्यावश्यक केमोथेरपी औषधांच्या टंचाईला सामोरे जावे लागल्यानंतर अखेर केंद्र सरकारने त्यांच्या किंमती वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने ७ जून २०२६ रोजी तत्त्वतः मंजुरी दिल्यानंतर ११ जून २०२६ पासून राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरणाने (एनपीपीए) दोन महत्त्वाच्या कर्करोगविरोधी औषधांच्या कमाल किमतीत तब्बल १० ते ५० टक्क्यांपर्यंत वाढ लागू केली. मात्र हा निर्णय वेळेत घेतला असता तर देशभरातील रुग्णांना औषधांसाठी वणवण भटकावे लागले नसते असा सवाल आता उपस्थित होत आहे.





सिस्प्लॅटिन आणि कार्बोप्लॅटिन ही फुफ्फुस, गर्भाशय, स्तन, अंडाशय, तोंड तसेच इतर अनेक कर्करोगांवरील प्रथम श्रेणीतील केमोथेरपी औषधे आहेत. या औषधांचे दर सरकारच्या नियंत्रणाखाली असल्याने कच्च्या मालाचा खर्च प्रचंड वाढूनही उत्पादक कंपन्यांना किंमत वाढविता येत नव्हती. परिणामी अनेक कंपन्यांनी उत्पादन कमी केले किंवा थांबविले आणि देशभरात टंचाई निर्माण झाली. सरकारी रुग्णालयांतील रुग्णांवर त्याचा सर्वाधिक परिणाम झाला.

विशेष म्हणजे, कर्करोग रुग्ण, डॉक्टर आणि रुग्णालयांकडून अनेक महिन्यांपासून औषधटंचाईबाबत इशारे दिले जात होते. तरीही केंद्र सरकारने तातडीने निर्णय न घेता टंचाई गंभीर झाल्यानंतरच दरवाढीस परवानगी दिली. त्यामुळे सरकारच्या औषध दरनियंत्रण धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कर्करोगावरील अत्यावश्यक औषधे सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्यासाठी किंमत नियंत्रणाचे धोरण राबविण्याचा गाजावाजा करणाऱ्या केंद्र सरकारलाच अखेर त्याच औषधांच्या किमती वाढविण्यास मंजुरी द्यावी लागली आहे. प्लॅटिनम-आधारित केमोथेरपी औषधांचा देशभर तुटवडा निर्माण झाल्यानंतर सरकारने अपवादात्मक दरवाढ मान्य केली असून त्यामुळे औषध धोरणातील सातत्य, नियोजन आणि दूरदृष्टीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

### अत्यावश्यक औषधेच बाजारातून गायब

सरकारचा दावा आहे की पश्चिम आशियातील संघर्ष, प्लॅटिनमच्या जागतिक किमतीतील वाढ, आयात खर्च आणि रुपयातील चढ-उतार यामुळे उत्पादन खर्च वाढला. त्यामुळे औषधांचा पुरवठा कायम ठेवण्यासाठी एकदाच विशेष दरवाढ करावी लागली. मात्र विरोधकांचे म्हणणे आहे की परिस्थिती आधीच स्पष्ट असताना सरकारने वेळेवर हस्तक्षेप केला असता तर रुग्णांना औषधांच्या टंचाईचा सामना करावा लागला नसता. सरकारने यापूर्वी संसदेत १३१ कर्करोगविरोधी औषधांवर किंमत नियंत्रण असल्याचा आणि त्यामुळे रुग्णांचे मोठे आर्थिक संरक्षण होत असल्याचा दावा केला होता. परंतु प्रत्यक्षात अत्यावश्यक औषधेच बाजारातून गायब झाल्याने केवळ किंमत नियंत्रण पुरेसे नसून उपलब्धतेची जबाबदारीही सरकारचीच असल्याची टीका आरोग्य क्षेत्रातून होत आहे.

### दरवाढ सार्वजनिक हितासाठी तात्पुरती

दरम्यान, केंद्र सरकारने ही दरवाढ सार्वजनिक हितासाठी तात्पुरती असल्याचे सांगितले असून सहा महिन्यांनंतर तिचा फेरआढावा घेतला जाणार आहे. मात्र तोपर्यंत रुग्णांना औषधांचा नियमित पुरवठा होणार का, उत्पादन पूर्वपदावर येणार का आणि भविष्यात अशी टंचाई टाळण्यासाठी सरकार कोणती यंत्रणा उभारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.स्वस्त औषधांचा दावा आणि त्यानंतर टंचाईमुळे झालेली दरवाढ यामुळे केंद्र सरकारच्या औषध धोरणावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, रुग्णांना दिलासा देणारे निर्णय केवळ घोषणांपुरते न राहता त्यांची परिणामकारक अंमलबजावणी होणे अधिक महत्त्वाचे असल्याचे या संपूर्ण घडामोडीतून स्पष्ट झाले आहे.

## गेवराई पोलीसांनी एकुण ६६ गुन्ह्यातील ०२ वर्षापुर्वीचा जप्त मुद्देमाल केला नष्ट

**बीड । प्रतिनिधी**



मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनती काँवत, यांनी पोलीस ठाणे स्तरावर जप्त मुद्देमाल कायदेशीर प्रक्रीयेचा अवलंब निर्गती करण्याबाबत दिलेल्या आदेशानुसार मा.समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक बीड, मा.अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी गेवराई यांच्या मार्गदर्शनानुसार किशोर पवार, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे गेवराई यांनी मा. न्यायादंडाधिकारी, प्रथमवर्ग न्यायालय, गवेराई यांचेकडून प्राप्त आदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क बीड कार्यालयाचे अधिकारी श्री. राहुल वानवळे, दुय्यम निरीक्षक व दोन पंचासमक्ष एकूण ६६ गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

सदर कारवाई मा. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, मा.समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड व श्री. अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, सफौ/८९४ भिसे, पोह/२२३ कल्याण राठोड, मुद्देमाल कारकून पोह/११३० रघुनाथ शेवरे, पोकॉ/२२१३ महेश भागवत व कोर्ट पैरवी पोह/१३४३ विठ्ठल म्हेत्रे यांनी विशेष कामगिरी बजावली.

## बीड शहर पोलीस ठाण्यात झेंड्याच्या चबुतऱ्याची अल्पावधीतच दुरावस्था

### स्वातंत्र्य दिनापर्यंत दुरुस्ती होईल का? : एस.एस.युसूफ

**बीड । प्रतिनिधी**

कोट्यावधी रुपये खर्चून कबाड गल्ली येथे बीड शहर पोलीस ठाण्याची नवी टोलेजंग इमारत बांधण्यात आली. तिथे वर्ष होत नाही तोच इमारती समोर बांधण्यात आलेला झेंड्याचा चबुतरा दुरावस्थेत गेला आहे. चबुर्तय़ाच्या एका बाजूचा कोपरा तुटल्याने तेथील स्टील खांब निखळून पडले आहे. लवकरच स्वातंत्र्य दिन (१५ऑगस्ट) येणार असल्याने तोपर्यंत या चबुतऱ्याची दुरुस्ती होईल का? असा प्रश्न या अनुषंगाने मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.





याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शासकीय-प्रशासकीय इमारती कोणत्याही विभागाच्या असो, त्या बनविताना शासकीय तिजोरीतून मुक्त हस्ते कोट्यावधी रुपयांची उधळण केली जाते. एकदा इमारत तयार झाली की त्याकडे त्या इमारतीमध्ये कर्तव्य बजावणारे अधिकारी असो की कर्मचारी ते कधीच गांभीर्याने पाहत नाहीत. यामुळे कोट्यावधींच्या इमारतीची अल्पकाळातच नासधूस सुरू होते. यामुळे कोट्यावधी रुपये खर्चून बांधलेल्या इमारतींना मोठ्या प्रमाणात गालबोट लागते. अशाच प्रकारे बीड शहर पोलीस ठाण्याच्या इमारतीला सुद्धा झेंड्याच्या चबुतऱ्याचा कोपरा तुटून स्टील खांब आडवा झाल्याने गालबोट लागले आहे. हा गुणवत्तेचा विषय आहे. अल्पावधीतच तूट-फूट झाल्याने इमारतीचे बांधकाम कोणत्या दर्जाचे झाले असेल, याबद्दल शंकाही उपस्थित होत आहे. चबुतरा दुरुस्त व्हावा म्हणून वरून (आकाशातून) कुणी येऊन काम करणार नाही तर तिथे कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनाच त्याकडे लक्ष देऊन दुरुस्ती करून घ्यावी लागेल परंतु त्याकरिता कर्तव्यावर असलेल्या प्रत्येकाची इच्छाशक्ती पाहिजे. पुढील महिन्यात आपल्या देशाचे स्वातंत्र्य दिन म्हणजेच १५ ऑगस्ट येणार आहे ते साजरे करण्यासाठी अनेक शासकीय-प्रशासकीय इमारतींमध्ये आपल्या देशाचा तिरंगा झेंडा फडकविला जातो. हे लक्षात घेता १५ ऑगस्ट पर्यंत तरी बीड शहर पोलीस ठाणे येथे झेंड्याच्या चबुतऱ्याची दुरुस्ती होईल? का असा प्रश्न मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.

## बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह चारीत सापडला; केसापुरी परिसरात शोककळा

**माजलगाव । प्रतिनिधी**



माजलगाव तालुक्यातील केसापुरी येथील रहिवासी असलेल्या सुंदरराव साहेबराव शिंगाडे यांचा मृतदेह रविवारी सकाळी गावाशेजारील चारीमध्ये आढळून आला. शनिवारी दुपारपासून ते बेपत्ता होते. या घटनेमुळे संपूर्ण केसापुरी परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून शिंगाडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुंदरराव शिंगाडे हे शनिवारी, दि. २७ जून २०२६ रोजी दुपारी दोनच्या सुमारास जेवण करून घराबाहेर पडले होते. मात्र, बराच वेळ उलटूनही ते घरी न परतल्याने कुटुंबीयांना चिंता वाटू लागली. त्यांचे पुत्र मधुकर शिंगाडे, पत्नी गंधारी शिंगाडे, पुतणे व इतर नातेवाईकांनी रात्रभर परिसरात त्यांचा शोध घेतला, परंतु त्यांचा कुठेही पत्ता लागला नाही.

दुर्दैवाने, दुसऱ्या दिवशी म्हणजेच रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास केसापुरी गावालगत असलेल्या चारीमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह तरंगताना दिसून आला. ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली असता, तो मृतदेह सुंदरराव शिंगाडे यांचाच असल्याचे निष्पन्न झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. या हृदयद्रावक घटनेमुळे शिंगाडे कुटुंबीय पूर्णपणे कोलमडून गेले असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## गेवराई पोलीसांची अवैध दारू वाहतुकीवर कारवाई

### पोलो कार कारमधून अवैध दारू वाहतूक करणाऱ्या कारसह आरोपीस ताब्यात



**बीड । प्रतिनिधी**

एकूण ६,२८,८००/-रू चा मुद्देमाल जप्. मा.पोलीस अधीक्षक श्री. नवनती काँवत, यांच्या अवैध धंद्यावर कडक कारवाई करण्याच्या आदेशानुसार गेवराई पोलीसांनी पथक तयार करून विशेष मोहीम राबवून दिनांक ०७.०७.२०२६ रोजी सायंकाळी १७:४० वा. चे सुमारास गेवराई शहरात केलेल्या कारवाईत एक तेश्रज्ञीरसशप कंपनीच्या पोलो कार कारमधून अवैधरित्या विदेशी दारूची वाहतुक करताना एका आरोपीस कारसह ताब्यात घेण्यात आले. त्याच्या कारमध्ये एकूण ०७ विविध कंपनीच्या एकूण १३५ बाटल्या विदेशी दारू किंमत एकूण २९,८००/-रू चा साठा जप्त करण्यात आला असून पोलीस ठाणे गेवराई येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे.

सदर कारवाई मा. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, मा.समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड व श्री. अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, पोकॉ/१४६५ विनोद कुटे, पोकॉ/१६३ अनिकेत खेडकर, चापोकॉ/२०२८ राजेंद्र चोरमले यांनी सदर कारवाईत यांनी सहभाग घेतला.

## बीडच्या इतिहासात प्रथमच शालेय वाहतूक सुरक्षिततेवर भव्य कार्यशाळा

### जिल्हा वाहतुक शाखा, आरटीओ कार्यालय आणि रोटरी क्लबचा संयुक्त उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीला सर्वोच्च प्राधान्य देत बीडच्या इतिहासात प्रथमच शालेय वाहतूक सुरक्षिततेवर व्यापक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जिल्हा वाहतूक शाखा, बीड, रोटरी सेंटर फॉर रोड सेफ्टी अँड ट्रॅफिक अवेअरनेस तथा रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने श्री बंकटस्वामी महाविद्यालय, जालना रोड, बीड येथे शुक्रवार दि.४ जुलै २०२६ रोजी झालेल्या या कार्यशाळेत शाळांचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, स्कूल बस व रिक्षा चालक, अटेंडंट, पालक प्रतिनिधी आणि रोटरी सदस्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी सर्व संबंधित घटकांमध्ये समन्वय निर्माण करून रस्ता सुरक्षा जनजागृतीला बळ देणारा हा उपक्रम ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर धांडे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे अध्यक्ष रो. चंद्रप्रकाश सेठी, सचिव रो. मनोज थीगळे, रोटरी सेंटर फॉर रोड सेफ्टी अँड ट्रॅफिक अवेअरनेसचे संचालक प्रो. डॉ. प्रकाश कोंका, मुख्य सल्लागार रो. इंजी. राहुल बोरा, जिल्हा





वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, मोटार वाहन निरीक्षक रणजीत पाटील, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शशिकांत जाधव तसेच उपप्राचार्य प्रो. डॉ. शंकर शिवशेट्टे उपस्थित होते.

कार्यशाळेचे प्रमुख प्रशिक्षक प्रो. डॉ. प्रकाश कोंका यांनी पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीचे विविध पैलू प्रभावीपणे उलगडून सांगितले. रस्ता सुरक्षा नियम, वाहनांतील ब्लाइंड स्पॉट, स्कूल बस व रिक्षांसाठी आवश्यक सुरक्षा निकष, शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक, पालक, चालक, अटेंडंट आणि विद्यार्थ्यांच्या जबाबदार्यांवर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची सुरक्षा ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून प्रत्येकाने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडल्यास अपघातांना मोठ्या प्रमाणात आळा घालता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच ऑगस्ट महिन्यापासून बीड शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये रस्ता सुरक्षा प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

मोटार वाहन निरीक्षक रणजीत पाटील यांनी शालेय वाहतूक करणार्या वाहनांची नियमित फिटनेस तपासणी, वैध परवाना व बॅजधारक चालकांकडूनच विद्यार्थ्यांची वाहतूक करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. मुख्याध्यापकांनी पालक, चालक आणि अटेंडंट यांच्याशी सातत्याने समन्वय ठेवून वाहतूक व्यवस्थेचा नियमित आढावा घ्यावा, असे त्यांनी सांगितले. चंपावती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती कुलकर्णी यांनी त्यांच्या शाळेत शासनाच्या निर्देशानुसार विद्यार्थी वाहतूक समिती कार्यरत असून चालक, अटेंडंट व पालकांच्या नियमित बैठका घेऊन सुरक्षित वाहतुकीबाबत सातत्याने जनजागृती केली जात असल्याची माहिती दिली. अशा कार्यशाळा प्रत्येक शाळेत आयोजित होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. पालक प्रतिनिधी आघाव यांनी पालकांनी अल्पवयीन मुलांच्या हातात वाहने देऊ नयेत, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत सतर्क राहावे आणि शाळा व वाहतूक व्यवस्थापनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले.

> शालेय वाहतुकीत कोणताही नियमभंग अथवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट करत संबंधितांवर कठोर दंडात्मक कारवाईचा इशारा दिला. वाहनाच्या क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक न करणे, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.
>
> **वैभव पाटील,**
> **प्रभारी पोलीस निरीक्षक,**
> **जिल्हा वाहतूक शाखा**




# महायुतीत 'नो-एन्ट्री' असा बोर्ड का लागला?

राज्यात महायुतीचा विस्तार आता थांबला असून कोणत्याही नव्या पक्षाला प्रवेश दिला जाणार नाही, अशी स्पष्ट घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. एकनाथ शिंदे यांच्या 'ऑपरेशन टायगर'नंतर भाजपा आणि शिंदे गटात सुप्त संघर्ष सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. राज्यातील फोडाफोडीच्या राजकारणावर भाष्य करताना सत्ताधारी भाजपाप्रणीत महायुतीत यापुढे कोणताही नवा राजकीय पक्ष सामील होणार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्यामुळे राज्यातील नव्या राजकीय समीकरणांच्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दिल्लीत भेट घेतल्यानंतर मंगळवारी फडणवीसांनी मुंबईत माध्यमांशी संवाद साधला. भाजपा आता कोणत्याही नव्या पक्षाला महायुतीत सामावून घेणार नाही. आम्ही नव्या मित्रपक्षांसाठी आमचे दरवाजे बंद केले असून, पक्षाच्या विस्तारासाठी कोणाचाही पक्ष फोडण्याचा आमचा हेतू नाही. भाजपाकडून शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पाडण्याचा प्रयत्न केला जात असल्याच्या सर्व चर्चा पूर्णपणे निराधार आणि तथ्यहीन असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. गेल्या महिन्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यानंतर शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होणार असल्याच्या चर्चांनी जोर पकडला. त्यातच राष्ट्रवादीच्या एका वरिष्ठ नेत्याने मुंबईत भाजपाच्या प्रभावशाली नेत्याची भेट घेतल्याचे वृत्त समोर आल्यानंतर या चर्चांना आणखीनच हवा मिळाली. या बैठकीत दोन्ही नेत्यांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीत संभाव्य प्रवेशाबाबत चर्चा झाल्याची माहिती समोर आली. यादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेल्या स्पष्ट संकेताचे पडसाद मुंबईतील भाजपाच्या प्रदेश कार्यालयातही उमटल्याचे पाहायला मिळाले. विरोधी पक्षांतील कोणत्याही नेत्याला पक्षप्रवेशाबाबतचे आश्वासन देऊ नये, अशा सूचना भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना देण्यात आल्याचे सूत्रांकडून समजते. एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीत सध्याची स्थिती कायम राहणार असल्याचे संकेत दिले असले तरी दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतेच 'ऑपरेशन टायगर' राबवले. त्या अंतर्गत ठाकरे गटातील सहा खासदार आणि विधानपरिषदेच्या एका आमदाराने शिंदेसेनेत प्रवेश केला. २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर फडणवीस आणि शिंदे यांच्यातील संबंध ताणले गेले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली असतानाच ही घडामोड घडली. सूत्रांच्या माहितीनुसार, ऑपरेशन टायगर' राबवले जात असताना राज्यातील भाजपाच्या वरिष्ठ नेते त्याविषयी फारसे उत्साही नव्हते. अशा फोडाफोडीच्या राजकारणामुळे राज्यातील जनतेचे लक्ष सरकारच्या कामकाजापेक्षा पक्षांतराच्या राजकारणाकडे वळते, असे काही नेत्यांचे मत होते. त्याशिवाय या पक्षप्रवेशामुळे शिंदे गटाचे लोकसभेतील संख्याबर १३ इतके झाल्यामुळे त्यांची महायुतीतील राजकीय ताकद आणखीनच वाढणार असल्याची भीती काही नेत्यांना सतावत होती. त्याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात सुप्त संघर्ष होत असल्याची कुजबूजही सुरू झाली. ठाकरे गटातील दोन प्रभावशाली नेते भाजपात प्रवेश करण्यास अधिक उत्साही होते. मात्र, भाजपाने सामावून घेण्यास नकार दिल्यानंतर त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश केला. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही नेत्यांकडूनही अशाच प्रकारचे प्रयत्न झाला होता; पण भाजपाने त्यांनाही नकार दिल्याचे समजते. शरद पवार गटातील नेत्यांना पक्षात सामावून घेतल्यास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची नाराजी वाढू शकते. तसेच पक्षाच्या दीर्घकालीन राजकीय रणनीतीवरही त्याचा परिणाम होऊ शकतो, अशी भीती भाजपाच्या नेत्यांना सतावत होती. उद्धव ठाकरे यांच्या तुलनेत शरद पवार यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चांगले संबंध राहिलेले आहेत. त्यांनी अनेक प्रसंगी पक्षीय राजकारणापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य देण्याची भूमिका घेतलेली आहे. त्यामुळेच राष्ट्रवादीत फूट न पाडताही शरद पवार यांचे विविध मुद्द्यांवर समर्थन घेतले जाऊ शकते, असेही भाजपाचे मत असल्याचे सूत्रांनी सांगितले. यादरम्यान भाजपाची ही भूमिका पूर्णत: विरोधाभासी असल्याचे मानले जाते. कारण– यावर्षीच्या सुरुवातीला झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी भाजपाने राज्यभरात पक्षविस्ताराची मोहीम प्रभावीपणे राबवली होती. त्या अंतर्गत विविध पक्षातील नेते तसेच पदाधिकाऱ्यांना भाजपात प्रवेश दिला जात असल्याचे दिसून येत होते. राज्यातील भाजपाचे सर्वोच्च निर्णय घेणाऱ्या कोअर कमिटीतील एका सदस्याने नाव न घेण्याच्या अटीवर सांगितले की, आम्हाला महायुतीत चौथा किंवा पाचवा मित्रपक्ष अजिबात नको आहे. आघाडीच्या राजकारणात तीन पक्षही अनेकदा पुरेसे असतात. मग विनाकारण आणखी एक राजकीय ओझे का वाढवायचे? भाजपामधील सूत्रांच्या मते, शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या दोन मित्रपक्षांच्या राजकीय हिताला धक्का पोहोचेल अशी कोणतीही भूमिका घेण्याबाबत पक्षश्रेष्ठी सावध आहे. ठाकरे गट आणि शरद पवार गटातील नेत्यांना फोडून महायुतीचा विस्तार करण्याचा प्रयत्न झाल्यास त्यातून मित्रपक्षांमध्ये अस्वस्थता निर्माण होऊ शकते, याची भाजपाला पूर्ण जाणीव आहे. या दोन्ही पक्षांचा पाठिंबा केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर केंद्रातही भाजपासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. एका वरिष्ठ नेत्याने सांगितले की, २०२२ मध्ये एकसंध शिवसेना आणि २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर मिळालेल्या धड्यांमधून महायुतीत नवीन मित्रपक्ष नको अशी नवीन भूमिका भाजपाने घेतली आहे. २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी भाजपाशी युती तोडून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले होते. त्यामुळेच भाजपाच्या नेत्यांनी ठाकरे यांना विश्वासघाती संबोधत नवीन मित्रपक्षांबरोबर आघाडी केली होती. भाजपामधील एका गटाच्या मते, पक्षाने आता स्वतःची संघटना अधिक मजबूत केली आहे. २८८ सदस्यांच्या विधानसभेत एकट्या भाजपाचे तब्बल १३२ आमदार आहेत. त्यामुळे नव्या नेत्यांना पक्षात घेण्यापेक्षा विद्यमान आमदार आणि कार्यकर्त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे हेच पक्षासमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे. अनेकदा बाहेरून आलेल्या नेत्यांना सामावून घेण्याच्या नादात पक्षातील एकनिष्ठ कार्यकर्त्यांवर मोठा अन्याय होतो. यापूर्वी आम्ही अशा पक्षप्रवेशांचे समर्थन केवळ पक्षविस्तारासाठी करत होतो; पण आज विधानसभेत आमचे सर्वाधिक आमदार असल्यामुळे बाहेरील नेत्यांपेक्षा आम्हाला पक्षातील नेत्यांवरच अधिक लक्ष देण्याची गरज आहे, असे भाजपाच्या वरिष्ठ नेत्याने सांगितले. तसेच, तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये ताळमेळ बसवणे हेदेखील भाजपासमोरील एक मोठे आव्हान आहे. वरच्या पातळीवरील नेते जरी एकत्र दिसत असले, तरी जिल्हा आणि तालुका पातळीवर तीनही पक्षांच्या कार्यकर्त्यांना एकमेकांच्या कार्यपद्धतीशी जुळवून घेणे अद्याप कठीण जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गड असलेला ठाणे आणि सुनेत्रा पवार यांचा प्रभाव असलेला पुणे जिल्ह्यात सातत्याने महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद होत असल्याची चिंताही भाजपाच्या एका नेत्याने व्यक्त केली आहे. संसदेतील महिला आरक्षण, मतदारसंघांची पुनर्रचना आणि 'एक देश, एक निवडणूक' यांसारख्या महत्त्वाच्या घटनात्मक सुधारणा मंजूर करून घेण्यासाठी भाजपाला शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांसारख्या मित्रपक्षांचा पाठिंबा आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

# तुतारीचे सहाल चाऊस दादाच्या 'घड्याळा'च्या मेळ्यात!

## लवकरच होणार अजित दादाच्या राष्ट्रवादी प्रवेश; विकास कामाच्या नावावर सहाल चाऊस यांची आ. सोळंकेशी सलंगी विकासाच्या नावाने मात्र बोंबा बोंब...

**माजलगाव । शेख अखिल**

प्रशासकीय काळात पालिकेवर आ. प्रकाश सोळंके यांचे अधिराज्य होते त्याच अधिराज्यात विकास कामाच्या नावावर करोडो रुपयाचा निधी खर्च केला मात्र कोणताच कामाचा दर्जा दिसून आल्याने शहरातील नागरिकांनी नगरपालिका कोणत्याही परिस्थितीत आमदार सोळंके यांच्या ताब्यात नगरपालिका जाऊ द्यायची नाही म्हणून आ. प्रकाश सोळंके यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला तिसऱ्या क्रमांकावर जनतेने पाठविले त्यामुळे आ. सोळंके यांच्यावर नामुष्कीची वेळ आली होती पण निवडणुकीत चाऊस सोळंके यांचा कलगी तुरा झाला व चाऊस यांना सर्वाधिक साथ मिळाली ती बाबुराव पोटभरे यांची पण चानाक्ष आ. प्रकाश सोळंके यांनी पालिकेतील पाणीपुरवठा व भू निघत गटार योजनेच्या ४०० कोटी कामाच्या काळजी पोटी कोणती काळजी आहे हे माजलगावकरांना चांगले ज्ञान आहे सर्व आरोप पत्यारोपाचे विसरून आ. सोळंके व सहाल चाऊस यांची दिल जमाई झाली.

आ.सोळंके विरोधात मतदान करण्याचा नागरिकांनी आवडली नाही सहाल चाऊस यांच्या सुनबाई नगराध्यक्ष असताना स्वतः उपनगर अध्यक्ष आ. सोळंके यांच्या मदतीने झाले या दिल जमाईत आ.सोळंके चाऊस यांनी स्वर्गीय अजित दादाची भेट घेऊन तेव्हाच अजित दादाच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्याची इच्छा सहाल चाऊस यांनी युक्त केल्याची माहिती स्वर्गीय अजित दादांनी दिली पण दुर्दैवाने अजित दादाचे विमान अपघाती निधन झाले म्हणून सहाल चाऊस यांचा पक्षप्रवेश लांबणीवर पडला. मात्र आ. प्रकाश सोळंके यांनी विधानसभा निवडणूक प्रचारात आमदार सोळंके यांना जेलमध्ये घालणार असल्याचे भीष्म प्रतिज्ञा करण्याचा चाऊस यांनी राष्ट्रवादी पवार गटाचे मोहन जगताप यांना डावलून विकासाच्या नावाखाली आ. सोळंके यांच्याशी सलगी केली ही सलगी एवढी वाढली की, आ. प्रकाश सोळंकी यांनी त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या बैठकीत सहल चाऊस यांना प्रमुख उपस्थित नेऊन बसविले यावरून सहाल चाऊस राष्ट्रवादी काँग्रेस स्वर्गीय अजित दादा पवार गटाचे रमलेले दिसतात ते तुतारीला सोडून राष्ट्रवादी काँग्रेसची घड्याळ हातात बांधण्याच्या तयारीत दिसत आहेत.


**४६ कोटीचा विकास दोन वर्षापासून नाचतोय**

मंदिरात रोड ते मनुर रोड संभाजी चौक आंबेडकर चौक ते आंबेडकर नगर बागवान गल्ली ते दाल मिल हा विकास गेल्या २ वर्षापासून नाचतोय या विकास कामाचे अभावी मंजरथ रोडवर चांगले मुश्किल झालेले आहे संभाजी चौकापर्यंत रस्त्याचे काम करताना गरीबाचे अतिक्रमण तौरीत पाळली गेली पण मोठ्यापर्यंत आले की कामे ठप्प झाले या रस्त्यात अभावी भागातील नागरिकांना कुठेपर्यंत मरण यातना भोगावे लागण्याची वेळ माजलगाव नगरपालिका व आ. प्रकाश सोळंके आणणार आहे.

## शेख सलमा बेगम अब्दुल रशीद अजीजपुरा केंद्र बीड च्या केंद्रप्रमुखपदी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद च्या शिक्षण विभागात गेल्या पंधरा वर्षांपासून आपल्या उत्कृष्ट अध्यापनातून विद्यार्थ्यांना विद्यादान करणाऱ्या उच्च विद्या विभूषित शेख सलमा बेगम अब्दुल रशीद यांची नुकतीच अज़ीज़पुरा केंद्र, बीड केंद्राच्या केंद्रप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल समाजातील सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांनी आतापर्यंत केलेल्या उत्कृष्ट कार्याला केंद्र प्रमुख पदी नियुक्ती झाल्यानंतर अजून जास्तीची झळाळी मिळो अशा सदिच्छा व्यक्त केल्या जात आहेत.



शेख सलमा बेगम अब्दुल रशीद या २०११ साली जिल्हा परिषद शिक्षण विभागात सहशिक्षिका म्हणून रुजू झाल्या. त्यांचे शिक्षण एम.ए. (इंग्रजी), एम.एस.सी. (केमिस्ट्री), डी.एड, बी. एड, डी.एस.एम., सी.पी.सी.टी. पर्यंत झालेले आहे. लहान मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून अत्यंत साध्या व सुलभ पद्धतीने त्यांनी पहली उडान नावाचे पुस्तकही लिहिले आहे. या पुस्तकाला मोठमोठ्या शिक्षण तज्ञांकडून गौरविले गेले आहे.

आतापर्यंत त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दु, सुरंगळी, ता.भोकरदन, जि.जालना. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महारटाकळी, ता.गेवराई, जि.बीड. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मोंढा, ता.गेवराई, जि. बीड आणि जिल्हा परिषद माध्यमिक शाळा कन्या उर्दु बीड येथे सहशिक्षिका व चार वर्ष मुख्याध्यापिकेचा उत्कृष्टपणे पदभार सांभाळत विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण देत कर्तव्य बजावले आहे. त्यांच्या उत्कृष्ट अध्यापनाची नोंद घेत विविध संस्था व संघटनांकडून त्यांना आतापर्यंत जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय पातळीवर १२ वेळा आदर्श शिक्षिका पुरस्कारांनी गौरविले गेले आहे. अशा कर्तबगार सहशिक्षिका शेख सलमा बेगम अब्दुल रशीद यांनी विभागीय स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवून दिनांक ७ जुलै २०२६ रोजी केंद्रप्रमुख पदाला गवसणी घातली आहे. आता त्यांच्या खांद्यावर केंद्रप्रमुख म्हणून अज़ीज़पुरा केंद्र अंतर्गत येणाऱ्या ९५ शाळांची जबाबदारी राहणार आहे. ज्यामध्ये ऊर्दू, मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विविध शाळांचा समावेश आहे. शेख सलमा बेगम अब्दुल रशीद यांनी आतापर्यंत जसे कर्तव्यदक्ष राहून कार्य केले आहे, यापुढेही त्यांच्या हातून केंद्रप्रमुख म्हणून असेच कर्तव्य त्या नक्कीच पार पाडतील अशा अपेक्षा व्यक्त होत असून समाजाच्या सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बीडमध्ये येऊन उद्धव ठाकरे साधी सुमंत रुईकर कुटुंबाची भेट घेऊ शकले नाही? : धनंजय पापा सोळंके

**माजलगांव । शेख अखिल**

शिवसेना (शिंदे गट) माजलगांव शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या बीड दौऱ्यावर तीव्र टीका करत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. बीडमध्ये येऊनही दिवंगत शिवसैनिक सुमंत रुईकर यांच्या कुटुंबीयांची साधी भेट न घेतल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सोळंके म्हणाले की, स्वतःला कुटुंबप्रमुख म्हणवून घेणारे उद्धव ठाकरे परळीत आले, मात्र प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले नाही. तसेच परळीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून जात असतानाही बाजूलाच असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यासाठी वेळ काढला नाही. अंबाजोगाई दौऱ्यादरम्यानही ग्रामदैवत श्री जोगेश्वरी देवीचे दर्शन न घेतल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच देवीच्या छायाचित्राबाबतही आक्षेपार्ह वर्तन झाल्याची चर्चा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. केज येथे मुसळधार पावसात काही शिवसैनिक स्वागतासाठी तासन्तास थांबले होते, मात्र त्यांचा साधा सत्कारही स्वीकारला गेला नाही. जर सत्कार स्वीकारायचाच नव्हता, तर परळी, बीड आणि अंबाजोगाईतील सत्कार का स्वीकारण्यात आले, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

धनंजय पापा सोळंके यांनी दिवंगत शिवसैनिक सुमंत रुईकर यांचा विशेष उल्लेख करत सांगितले की, त्यांनी आपल्या कुटुंबप्रमुखांना दीर्घायुष्य लाभावे म्हणून हजारो किलोमीटरची तिरुपतीपर्यंत पायी यात्रा सुरू केली होती. मात्र दुर्दैवाने प्रवासादरम्यान त्यांचे निधन झाले. अशा निष्ठावंत शिवसैनिकाच्या कुटुंबीयांची साधी विचारपूसही न करणे हे त्या कुटुंबासाठी अत्यंत वेदनादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

याउलट, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुमंत रुईकर यांच्या कुटुंबाला मदतीचा हात देत त्यांचा संसार पुन्हा उभा केला. त्यांना घर बांधून देणे, संसारोपयोगी साहित्य उपलब्ध करून देणे आणि नव्याने जगण्याची उमेद देणे, हीच निष्ठावंत शिवसैनिकांप्रती खरी बांधिलकी असल्याचे सोळंके यांनी म्हटले. आज हजारो आमदार, खासदार, पदाधिकारी आणि शिवसैनिक बाळासाहेबांच्या विचारांच्या शिवसेनेत प्रवेश करत आहेत. ते असे का करत आहेत, याचे एकदा तरी आत्मचिंतन करण्याची गरज आहे, असेही धनंजय पापा सोळंके यांनी आपल्या पत्रकात म्हटले आहे.

## काँग्रेस नेते दत्ता भाऊ कांबळे यांचा वाढदिवस ठरतोय सामाजिक बांधिलकीचे प्रतीक

### ब्रम्हगाव जिल्हा परिषद शाळेत गरजूंना शालेय साहित्य वाटप

**माजलगाव । प्रतिनिधी**

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता भाऊ कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त ब्रम्हगाव येथील जिल्हा परिषद शाळेत गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले. काँग्रेस नेते दत्ता भाऊ कांबळे यांचा ६ जुलै हा वाढदिवस दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा होतो. यावर्षीही सामाजिक बांधिलकी जपत ब्रम्हगाव येथील जिल्हा परिषद शाळेत गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.



यावेळी ब्रम्हगावचे उपसरपंच गंगाराम शेंडगे, माजी उपसरपंच प्रल्हाद कांबळे,मानवी हक्क अभियानचे मधुकर कांबळे, मुख्याध्यापक मुरली गवळी,काँग्रेसचे सुधाकर कांबळे, शालेय समिती अध्यक्ष नितीन कांबळे, आर.कें. कंपनीचे संचालक संकेत उर्फ राधे भैया कासार, अशोक शिंदे, ग्रामपंचायत सदस्य अंजन कांबळे, पंडित कांबळे, दशरथ कांबळे, रतन कांबळे अंशीराम कांबळे, चंद्रसेन पाटुळे, सारंग शेंडगे आदींची उपस्थिती होती. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृष्णा शिंदे, कमलेश कांबळे, किरण कांबळे, सुखदेव आढागळे, दत्ता कांबळे, आदित्य कांबळे, दीपक कांबळे, संतोष कांबळे, सौरभ कांबळे, आदर्श कांबळे, मनोज गायकवाड, सखाराम अडागळे, विशाल कांबळे, ज्ञानणेश्वर कांबळे, आदर्श कांबळे यांनी परिश्रम घेतले.

**वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबविणे काळाची गरज : दत्ता भाऊ कांबळे**

आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो, याच भावनेतून दरवर्षी माझा वाढदिवस समर्थक सामाजिक उपक्रमांनी साजरा करतात. यावर्षी सुद्धा गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. समाजातील उपेक्षित घटकांना वाढदिवसाच्या निमित्ताने आधार देता येऊ शकतो, कोणताही बडेजाव किंवा भपकेबाज प्रकारे वाढदिवस साजरा न करता सामाजिक बांधिलकीतुन काम करण्याची गरज आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते दत्ता भाऊ कांबळे यांनी दिली.

## एसआयआर प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवा : सोहेल अत्तार

**माजलगाव । प्रतिनिधी**



राज्यात सध्या विशेष मतदार पुनरीक्षण (डखठ) अभियान सुरू बीड जिल्हयातील नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन अँड श्रीनिवास बेदरे यांनी केले आहे केले. पुढे बोलताना अँड श्रीनिवास बेदरे म्हणले, राज्यात सध्या विशेष मतदार पुनरीक्षण (डखठ) अभियान सुरू असून बीएलओ घराघरात जाऊन सुमारे २ कोटी ६४ लाख मतदारांची पडताळणी करत आहेत. नागरिकांनी क्यूआर कोड असलेला डखठ एनुमरेशन फॉर्म काळजीपूर्वक भरावा, त्यावर स्वाक्षरी करावी आणि फॉर्म जमा केल्यानंतर त्याची पोच अवश्य घ्यावी. आपला मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक मतदाराने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा. कोणतीही शंका असल्यास संबंधित बीएलओ यांच्याशी संपर्क साधावा असे आव्हान ए आय एम आय एम युवा नेते सोहेल अत्तार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## नवनिर्वाचित वकिलांचा गौरव सोहळा उत्साहात संपन्न




**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा वकील संघाचे ग्रंथ (ग्रं.) सचिव अ‍ॅड. सय्यद अजीम यांच्या पुढाकाराने एलएल.बी. उत्तीर्ण झालेल्या नवनिर्वाचित वकिलांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. विधी क्षेत्रात नव्याने प्रवेश करणाऱ्या युवकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष प्रतिनिधी व सिटीझन वर्तमानपत्राचे संपादक शेख मुजीब भाई उपस्थित होते व त्यांच्या हस्ते तसेच अ‍ॅड. रईसभाई पठाण, अ‍ॅड.सय्यद साजेद, अ‍ॅड. शेख फिरोज, अ‍ॅड. शेख इम्रान, अ‍ॅड. शेख बिलाल आणि अ‍ॅड. सय्यद मिनहाज, नाहेद बागवान यांच्या हस्ते एलएल.बी. उत्तीर्ण झालेल्या नवनिर्वाचित वकिलांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित वकिलांना प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि सामाजिक बांधिलकी जपत न्यायव्यवस्थेची सेवा करण्याचे आवाहन केले. न्यायव्यवस्थेतील वकिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून समाजात न्याय आणि कायद्याविषयी विश्वास दृढ करण्यासाठी तरुण वकिलांनी सकारात्मक योगदान द्यावे, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास बीड जिल्हा वकील संघातील विधी क्षेत्रातील मान्यवर तसेच नवोदित वकिल मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



गीता कन्या प्रशालेचे राम विष्णू क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मंगलमय शुभेच्छा देताना कस्तुराबाई रामभाऊ ओव्हाळ, रिया उत्तम ओव्हाळ, नंदनी उत्तम ओव्हाळ व ओव्हाळ परिवाराच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

## शिवसेनेच्या अल्पसंख्याक विभाग केज तालुका प्रमुखपदी सय्यद माजेद यांची निवड

**केज । प्रतिनिधी**

केज शिवसेना अल्पसंख्याक विभागाच्या केज तालुका प्रमुख पदी पत्रकार सय्यद माजेद यांची निवड करण्यात आली आहे. त्यांना नियुक्ती पत्र अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा प्रमुख अ‍ॅड. लालाखान पठाण यांनी दिले आहे. निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे व धर्मविर आनंद दिघे यांची शिकवण व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, युवासेना प्रमुख खासदार श्रीकांत शिंदे, अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा विधान परिषद आमदार सईद खान यांच्या आदेशवरून सय्यद माजेद यांच्या शिवसेनेच्या अल्पसंख्याक विभागाच्या



केज तालुका प्रमुख पदाची जबाबदारी अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा प्रमुख ड. लालाखान पठाण यांनी सोपविली आहे. सय्यद माजेद यांना शिवसेना पक्षाचे विचार तळागळातील लोकांसह सर्व सामान्य माणसापर्यंत पोहचवून शिवसेना पक्ष वाढीसाठी प्रयत्न करावेत. तसेच सर्व समाजातील लोकांच्या सेवेत राहून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा सूचना दिल्या आहेत. निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त प्रहार दिव्यांग संघटनेचे दत्तात्रय कदम यांचा समाजोपयोगी उपक्रम

**पाटोदा । प्रतिनिधी**

आमदार बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त प्रहार दिव्यांग संघटनेचे पाटोदा तालुकाध्यक्ष दत्तात्रय कदम यांच्या पुढाकारातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सौंदाना येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचे औचित्य साधत समाजोपयोगी उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल तसेच इतर आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक हरिभाऊ नाईकनवरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



तसेच शिवराज कदम, नारायण कदम, शिवदास आगुंडे, महादेव कदम, दत्ता कदम, बालाजी कदम, ईश्वर कदम आणि सचिन कदम उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी प्रहार दिव्यांग संघटनेचे पाटोदा तालुकाध्यक्ष दत्तात्रय कदम यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या समाजोपयोगी उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली असून समाजात सकारात्मक संदेशही पोहोचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# ग्रामपंचायत स्तरावरील विशेष शिबिरातून मतदार गणना प्रपत्र भरणे, कागदपत्र पडताळणी व मतदार यादी अद्ययावतीकरणाला गती

## लिंबागणेश येथील 'एसआयआर' विशेष शिबिराची तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केली पाहणी

**लिंबागणेश । प्रतिनिधी**
भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर)-२०२६ अभियानांतर्गत बीड जिल्ह्यात ग्रामपंचायत स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या विशेष शिबिरांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ७ ते १० जुलै या कालावधीत हे अभियान राबविण्यात येत असून बुधवारी (दि. ८) बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी लिंबागणेश येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भरविण्यात आलेल्या विशेष शिबिराला भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.
यावेळी तहसीलदार शेळके यांनी पर्यवेक्षक राजेंद्र येडे, बूथस्तरीय अधिकारी तथा सहशिक्षक दिपक घाटे आणि भालचंद्र शिक्षण संस्थेचे शिक्षक शामराव ढास, सहशिक्षिका श्रीमती अयाचित, श्रीमती सानप, श्रीमती गिते यांच्याशी संवाद साधला. प्रत्येक पात्र मतदाराचे गणना प्रपत्र अचूकपणे भरून घेणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे तसेच मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व सर्वसमावेशक करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घेत अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर, विक्रांत वाणी, सय्यद अख्तर, समीर शेख, विनोद मोरे, अशोक




थोरात, संदीप पौळ, दासू थोरात आदी उपस्थित होते.

**जनजागृतीमुळे अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**
दवंडी, ध्वनिक्षेपक, समाजमाध्यमे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील स्वस्त धान्य दुकानदार, ग्रामरोजगार सेवक, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, कृषी सहाय्यक आदी कर्मचाऱ्यांची बूथस्तरीय अधिकाऱ्यांच्या सहाय्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे घराघरात पोहोचून गणना प्रपत्रांचे वितरण, पडताळणी आणि नागरिकांना मार्गदर्शन करण्याचे काम वेगाने सुरू असून अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

### प्रत्येक गावात विशेष शिबिरांद्वारे प्रपत्र भरण्याची सुविधा

एसआयआर अभियानांतर्गत प्रत्येक गावात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून बूथस्तरीय अधिकारी व नियुक्त सहाय्यक कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून गणना प्रपत्रांचे वाटप, प्रपत्र भरणे आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करीत आहेत. पावसाळ्याचा विचार करून जिल्हा परिषद शाळांमध्ये सुरक्षित ठिकाणी शिबिरांची व्यवस्था करण्यात आली आहे.

## कृषी दिनानिमित्त माळापुरी येथे वसंतराव नाईक जयंती उत्साहात साजरी

### प्रभात फेरी, प्रतिमापूजन व वृक्षारोपणातून महान नेत्याला अभिवादन

**माळापुरी । प्रतिनिधी**
ग्रामीण जागरूकता कार्यानुभव (ठ-थए) कार्यक्रमांतर्गत सौ.के.एस.के. (काकू) कृषी महाविद्यालय, बीड यांच्या वतीने १ जुलै कृषी दिन तथा हरितक्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मालापुरी येथे विविध उपक्रमांचे आयोजन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मालापुरी येथून काढण्यात आलेल्या प्रभात फेरीने झाली. प्रभात फेरीद्वारे विद्यार्थी, ग्रामस्थ व कृषीदूतांनी कृषी विकास, पर्यावरण संवर्धन आणि वसंतराव नाईक यांच्या कार्याचा संदेश गावभर पोहोचविला.
यानंतर आयोजित मुख्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माळापुरीचे सरपंच श्री. अशोक धस हे होते. त्यांच्या हस्ते



हरितक्रांतीचे शिल्पकार स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी वसंतराव नाईक यांच्या कृषी विकासातील ऐतिहासिक योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.
या कार्यक्रमास माळापुरीचे उपसरपंच श्री. समीरभाई बेग, जि. प. शाळा, मालापुरीचे मुख्याध्यापक श्री. मुकुंद नायकवडे, ग्रामसेवक श्री. स्वप्निल मिसाळ, तलाठी श्री. दशांत शेल्के, पोलीस पाटील सहायक श्री. रोहित तिपाले,डॉ. गोविंद वसंत साळुके (सहसचिव, श्री अनंत कृषी विकास प्रतिष्ठाण, बीड) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच सौ. के.एस.के. (काकू) कृषी महाविद्यालय, बीड येथील प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक प्रा. डी. बी. राठोड, कार्यक्रम अधिकारी डॉ. एस.जी. माने व प्रा. अक्षय गार्डी यांनी विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी कृषी दिनाचे महत्त्व, आधुनिक शेतीतील नवतंत्रज्ञान, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत शेती याविषयी सविस्तर माहिती दिली.
कार्यक्रमादरम्यान वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच विद्यार्थी व ग्रामस्थांनी कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन व अंमलबजावणी ठ-थए कार्यक्रमांतर्गत कार्यरत कृषीदूतांनी केली. यामध्ये सुमेध वाघमारे, वैद्य दत्ता, रोहन वखरे, पवन थोरात, अनंता थोरात, अमंत राजे, प्रतीक शिरामे, विजय शिंदे, आदित्य तळेकर आणि राहुल उबाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामस्थ, विद्यार्थी व शिक्षकांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत वसंतराव नाईक यांना अभिवादन केले.

## गरीबांचा देवदूत ठरलेले युवा डॉ. संकेत सानप आरोग्य दूत यांना दक्षिण अमेरिका पेरू संस्थेकडून मानद डॉक्टरेट; राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव

**संगमनेर । प्रतिनिधी**
अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील आदर्श तिगाव या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेले युवा समाजसेवक, आरोग्यदूत आणि पत्रकार डॉ. संकेत सुमन तुकाराम सानप (मुंबई) यांनी अल्पावधीत समाजसेवा, आरोग्य, वेलनेस आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून राज्यासह देशभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. मुंबईसारख्या महानगरात उपचारासाठी येणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोफत मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती, विविध रुग्णालयांमध्ये उपचार मिळवून देण्यासाठी आवश्यक समन्वय तसेच गरजू कुटुंबांना सातत्याने मदतीचा हात देण्याचे कार्य त्यांनी निःस्वार्थ भावनेने केले आहे. त्यामुळे अनेक गरजू नागरिक त्यांना गरीबांचा देवदूत म्हणून संबोधतात.
त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मारवाडी गुजराती सोशल कौन्सिल आणि इंटरनॅशनल ऑनोरिस कॉझा अवॉर्ड कौन्सिल यांच्या माध्यमातून,



दक्षिण अमेरिकेतील पेरू प्रजासत्ताकाशी संलग्न आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या प्रतिनिधीमार्फत त्यांना मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. आरोग्य, वेलनेस आणि पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा हा आंतरराष्ट्रीय सन्मान मानला जात आहे.
याशिवाय खक्ष-उ व चङ्ड-छ झ्रीीं. डींव. यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आरोग्य, वेलनेस, पत्रकारिता आणि सामाजिक कार्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना 'भारत गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ केलेल्या सामाजिक, पत्रकारिता आणि जनहिताच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना 'जीवन गौरव पुरस्कार' देऊनही सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे, सन २०२६ या वर्षात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राष्ट्रीय स्तरावरील संस्थांकडून त्यांच्या कार्याची दखल घेत २० हून अधिक राज्यस्तरीय पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. ग्रामीण भागातून पुढे येत समाजहितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या या युवा व्यक्तिमत्त्वाचा सन्मान हा संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा, संगमनेर तालुका आणि आदर्श तिगाव गावासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.
या गौरवानिमित्त आमदार अमोल खताळ, आमदार मोनिका राजळे, आमदार सत्यजित (दादा) तांबे, आमदार मनोज कायंदे, आमदार सुहास आण्णा कांदे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी आमदार बाळासाहेब थोरात, माजी आमदार सुधीर तांबे, नगराध्यक्षा मैथिली तांबे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, खासदार निलेश लंके, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार धनंजय मुंडे, आमदार संजय दौंड, आमदार गोकुळ गिते, आमदार नरेंद्र दराडे, आमदार रत्नाकर गुट्टे, डॉ. दुर्गा तांबे, मंत्री पंकजा गोपीनाथराव मुंडे, सुजय विखे पाटील, आमदार हेमंत ओगळे, आमदार निरंजन डावखरे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. समाजसेवा, पत्रकारिता आणि आरोग्य क्षेत्रात निःस्वार्थ भावनेने कार्य करणारे डॉ. संकेत सुमन तुकाराम सानप आगामी काळातही जनतेच्या सेवेसाठी अधिक व्यापक स्तरावर कार्यरत राहतील, असा विश्वास त्यांच्या सहकाऱ्यांनी, हितचिंतकांनी आणि नागरिकांनी व्यक्त केला आहे.

## कलम ४९८ अ कौटुंबिक हिंसाचार, पैशाची मागणी व इतर आरोपातून पतीसह सासरच्या ८ जणांची निर्दोष मुक्तता!

### ॲड. शेख इम्रान खाजा यांचा युक्तिवाद ठरला यशस्वी

**बीड । प्रतिनिधी**
कौटुंबिक जाचहाट, पैशाचे मागणी आणि मारहाण केल्याच्या आरोपाखाली पेठ बीड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातून बीड येथील माननीय अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने पतीसह सासरच्या सर्व ८ आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणात आरोपी पक्षाचे वकील ॲड.शेख इम्रान खाजा यांनी मांडलेला भक्कम कायदेशीर युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला.
या प्रकरणातील फिर्यादी सुमय्या सोहेल शहा हिचा विवाह ३१ डिसेंबर २०१८ रोजी सोहेल अय्याज शहा याच्यासोबत झाला होता. लग्नानंतर काही महिने चांगले नांदवल्या नंतर कौटुंबिक कर्ज फेडण्यासाठी ५०,००० रुपयांची मागणी करून पती आणि सासरच्या इतर नातेवाईकांनी शारीरिक व मानसिक छळ सुरू केला, तसेच



उपाशी पोटी ठेवून घरातून हाकलून दिले, अशी तक्रार फिर्यादी महिला व तिच्या आईने केली होती.
या तक्रारीवरून पेठ बीड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजि. नं. २९६/२०२३ अन्वये भादंवि कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६ आणि ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. न्यायालयीन सुनावणी दरम्यान बचाव पक्षाचे वकील ड. शेख इम्रान खाजा यांनी फिर्यादी पक्ष आणि साक्षीदारांची कसून उलटतपासणी घेतली. त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, फिर्यादीने लावलेले सर्व आरोप अत्यंत ढोबळ, संदिग्ध आणि परस्पर विरोधी आहेत.
दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचा संदर्भ घेत मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी स्पष्ट केले की, फिर्यादी पक्ष आरोपींवरील गुन्हे सिद्ध करण्यात पूर्णपणे अपयशी ठरला आहे. न्यायालयाने अंतिम आदेश जारी करत आरोपी पती सोहेल अय्याज शहा, अय्याज याकुब शहा, इब्रान अय्याज शहा, रेहाना अय्याज शहा, बुशरा इम्रान शहा, साहेब अय्याज शहा, तौफिक अय्याज शहा आणि शेख नाझिया शेख शाकीर या सर्व आठ जणांची सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात सर्व आरोपींच्या वतीने ॲडव्होकेट आय.के. शेख (शेख इम्रान खाजा) यांनी काम पाहिले. व त्यांना ॲड. अन्वर शेख, ॲड. सूर्यकांत पवार, ॲड. पंकज रायभोळे आणि इबाद शेख यांनी सहकार्य केले.

## मरहूम तौहीद खान हत्या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करा; सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र पाटोदा चे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**पाटोदा । प्रतिनिधी**
परळी येथील मरहूम तौहीद खान यांच्या हत्या प्रकरणाची विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत निष्पक्ष, सखोल व वेळबद्ध चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच पीडित कुटुंबाला न्याय, आर्थिक मदत व पुनर्वसन देण्यात यावे, अशी मागणी सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र पाटोदा च्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.
तहसीलदार, पाटोदा यांच्या मार्फत सादर करण्यात आलेल्या या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, परळी येथील मरहूम तौहीद खान यांची निर्घृण हत्या झाल्याने समाजात भीती व अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची कोणत्याही दबावाशिवाय निष्पक्ष चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, या घटनेमुळे मृताच्या कुटुंबावर मोठे आर्थिक व मानसिक संकट कोसळले असून कुटुंबातील एकमेव कमावती व्यक्ती गमावल्याने त्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने पीडित कुटुंबाला तातडीने विशेष आर्थिक मदत जाहीर करून कुटुंबातील एका पात्र सदस्याला शासकीय सेवेत नोकरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.




तसेच या प्रकरणाशी संबंधित व्हायरल ऑडिओ क्लिपची न्यायवैद्यकीय तपासणी करून त्यामधील कथित द्वेषपूर्ण वक्तव्ये व धमक्यांबाबत स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात यावा, पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाला असल्यास त्याचीही सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. याशिवाय पीडित पक्षाची बाजू न्यायालयात प्रभावीपणे मांडण्यासाठी शासनामार्फत सक्षम विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.
प्रमुख मागण्या : हत्या प्रकरणाची डखढ मार्फत निष्पक्ष व वेळबद्ध चौकशी. सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई. व्हायरल ऑडिओची फॉरेन्सिक तपासणी करून आवश्यक गुन्हे दाखल करणे. पुरावे नष्ट करण्याच्या प्रयत्नांची चौकशी. पीडित कुटुंबाला किमान १० लाख रुपयांची विशेष आर्थिक मदत. कुटुंबातील एका पात्र सदस्याला शासकीय नोकरी. सरकारी खर्चातून सक्षम विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती. न्याय मिळेपर्यंत संविधानिक व लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू राहील, असा इशाराही सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र पाटोदा च्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून ते तहसील कार्यालयात सादर करण्यात आले.

## जि.प.च्या धोकादायक शाळा इमारतींचा तातडीने सर्व्हे करून विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था करा : ए एस गोलू

**बीड । प्रतिनिधी**
पावसाळा सुरू होऊनही बीड जिल्ह्यातील गाव-खेडे-वस्तीतील अनेक जिल्हा परिषद शाळा अद्याप दुरुस्त झालेल्या नाहीत. भिंतींना तडे, छत गळणे आणि इमारती कोसळण्याच्या स्थितीत असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख मोहम्मद अझरुद्दीन ए.एस. गोलू यांनी दि.६/०७/२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना निवेदन दिले.



निवेदनात ए एस गोलू म्हणाले, गाव-खेड्यातील शाळा वर्षानुवर्षे दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत. पावसामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. लहान मुले अशा धोकादायक इमारतींमध्ये शिकत आहेत. तात्काळ दुरुस्ती करा:जिल्ह्यातील ज्या जिल्हा परिषद शाळा दुरुस्त नाहीत अशा सर्व शाळांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी.किंवा पर्यायी व्यवस्था करा: दुरुस्ती होईपर्यंत त्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी टिनशेड, अतिरिक्त खोल्या किंवा जवळच्या सुरक्षित शाळेत तात्काळ पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या या विषयावर प्रशासनाने तातडीने लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी शिव सेना अल्पसंख्याक जिल्हा प्रमुख मोहम्मद अझरद्दीन, ए एस गोलू यांनी केली आहे.


# पैलवान सुमित भारस्करचा एशियन चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णवेध

### बीडच्या मल्लाने थायलंडच्या मैदानावर फडकवला तिरंगा

**माजलगाव । प्रतिनिधी**
युनायटेड वर्ल्ड रेसलिंगच्या वतीने पटाया, थायलंड येथे सुरू असलेल्या ज्युनियर एशियन चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्रातील बीड जिल्ह्याच्या पैलवान सुमित आप्पासाहेब भारस्करने देशाला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. ७० किलो वजन गटात फ्रिस्टाईल प्रकारात खेळताना सुमितने आपल्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दमदार कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले.

**अशी झाली दैदिप्यमान कामगिरी**
स्पर्धेच्या पहिल्या फेरीत सुमितने किरगीझस्थानच्या पैलवानाचा ९-७ असा पराभव केला. दुसऱ्या फेरीत तुर्कस्तानच्या मल्लाला १-० अशा एकतर्फी गुणांनी हरवून त्याने अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीतील लढत अतिशय चुरशीची झाली. कझाकीस्थानच्या पैलवानाविरुद्ध १३-७ अशा गुणफरकाने विजय मिळवत सुमितने सुवर्णपदक पटकावले आणि देशाचा तिरंगा अभिमानाने फडकवला.

**६ वर्षांच्या मेहनतीचे चीज**
सुमित गेली ६ वर्षे पुणे जिल्ह्यातील मारुंजी येथील रुस्तम-ए-हिंद पै. अमोल बुचडे यांच्या कुस्ती अकादमीत प्रशिक्षण घेत आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'मिशन लक्ष्यवेध' योजनेअंतर्गत सुमितची निवड झाली असून सध्या तो बालेवाडी, पुणे येथील हाय परफॉर्मन्स सेंटरमध्ये जागतिक दर्जाचे प्रशिक्षण घेत आहे.
या ऐतिहासिक यशाबद्दल गुरुवर्य पै. अमोल बुचडे म्हणाले, हा कौशल्यवान खेळाडू बीडच्या कुस्तीची वैभवशाली परंपरा आपल्या खांद्यावर घेऊन पुढे जात आहे. जिल्हा व महाराष्ट्रवासियांचे ऑलिम्पिक पदकाचे स्वप्न एक दिवस नक्कीच साकार करेल. सुमितच्या या यशाबद्दल पै.अमोल बुचडे कुस्ती अकादमीचे प्रशिक्षक नरेंद्र कुमार, समीर देसाई, उत्कर्ष काळे, विनोद गोरे, कांबळे सर, अनिराज सर, कपिल बुचडे, किसन बुचडे, प्रा.महेश घुले, मिलिंद झोडगे यांच्यासह वडील आप्पासाहेब भारस्कर व कल्याण भारस्कर यांनी अभिनंदन केले आहे. महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्रातून आणि क्रीडाप्रेमींकडून सुमितवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




## अतिक्रमणाच्या नावाखाली गरीबांवरच कारवाई का?

### हातगाडी, भाजी, मच्छी विक्रेते आणि रुग्णालया समोरील गाड्यांना वाचवा : सलीम अध्यक्ष

**बीड । प्रतिनिधी**
बीड शहरात अतिक्रमण हटाव मोहिमेच्या नावाखाली प्रशासनाकडून सुरू असलेल्या कारवाईत केवळ गरीब आणि छोटे व्यवसायिकांनाच लक्ष्य केले जात असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते सलीम अध्यक्ष यांनी केला आहे. सलीम अध्यक्ष म्हणाले की, प्रशासन हातोडा आणि बुलडोझर घेऊन हातगाडी व्यावसायिक, भाजी विक्रेते, फळ विक्रेते आणि मच्छी विक्रेत्यांच्या गाड्या तोडत आहे. हजार-पाचशे रुपयांसाठी हे लोक पावसात भिजून, उन्हात तापून दिवसभर राबतात. पहाटे ४ वाजता मार्केटमधून भाजी-फळ आणून रात्री ८ वाजेपर्यंत विक्री करतात. तेव्हाच त्यांच्या घरची चूल पेटते. मग त्यांच्या हातगाड्या तोडणे म्हणजे त्यांच्या लहान मुलांच्या तोंडचा घास हिसकावणे आहे.



त्यांनी विशेषतः बीड जिल्हा रुग्णालयासमोरील परिस्थितीकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, जिल्हा रुग्णालयात रोज हजारो गोरगरीब रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपचारासाठी येतात. मोठ्या हॉटेलमध्ये जाणे त्यांना परवडत नाही. अशा वेळी रुग्णालयासमोरील छोटे चहाचे गाडे, नाश्त्याचे गाडे हेच त्यांचा एकमेव आधार आहेत. तिथे त्यांना स्वस्तात गरम दूध, गरम पाणी आणि जेवण मिळते. अशा गाड्या हटवल्या तर ते रुग्ण आणि नातेवाईक कुठे जातील? ही कारवाई म्हणजे हजारो रुग्णांच्या पोटावर लाथ मारण्यासारखी आहे.

**दुजाभाव का?**
सलीम अध्यक्ष यांनी सवाल केला की, शहरातील अनेक श्रीमंत लोकांचे १०-१५ फूट कॉम्प्लेक्स आणि घरे रस्त्यावर आलेली आहेत. ज्यांच्या इमारतीला खाली पार्किंग नाही. व्हीआयपी लोकांच्या मोठ्या गाड्या तासनतास रस्ता अडवतात. त्यांच्यावर कारवाई का होत नाही? फक्त गरीब भाजी, मच्छी, फळ आणि हातगाडी वाल्यांवरच अन्याय का होतो?
सलीम अध्यक्ष यांनी प्रशासनाला ३ मागण्या केल्या आहेत. जिल्हा रुग्णालयासमोरील आणि शहरातील सर्व छोटे व्यवसायिकांवरील कारवाई तात्काळ थांबवावी. प्रथम मोठ्या अतिक्रमणांवर आणि व्हीआयपी गाड्यांवर कारवाई करावी. गरीब व्यवसायिकांसाठी पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी. आम्ही अतिक्रमणाच्या विरोधात आहोत, पण कारवाई सर्वांसाठी सारखी असावी. गरिबांनी हा जुलूम आणखी किती दिवस सहन करायचा? असा सवाल सलीम अध्यक्ष यांना शेवटी केला.

# चिचोंडी पाटील येथे एसटी बस स्थानक निर्माण करा; पशुवैद्यकीय रुग्णालय इतरत्र हलवा!

## एस.एम.युसूफ, रमेश गंगाधरे यांची जबाबदार मंत्र्यांसह अधिकाऱ्यांकडे जोरदार मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड-अहिल्यानगर (अहेमदनगर) राज्यमार्गावर असलेल्या चिचोंडी पाटील या गावासाठी राज्यमार्गावर बस स्थानक निर्माण करण्यात यावे तसेच पशुवैद्यकीय रुग्णालय इतरत्र हलवावे अशी जोरदार मागणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परिवहन मंत्री, अहिल्यानगर चे पालकमंत्री, खासदार, आमदार, विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना बीड जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पाठविलेल्या निवेदनातून मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी केली आहे.

या विषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड - अहिल्यानगर (अहेमदनगर) राज्यमार्गावर असलेल्या चिचोंडी पाटील या गावासाठी याच राज्यमार्गावर असलेले बस स्थानक काही महिन्यांपूर्वी करण्यात आलेल्या रस्ता रुंदीकरणात राज्यमार्गाच्या निर्माणावेळी जमीन दोस्त करून तेथे रस्ता रुंद करण्यात आला. तेव्हापासून प्रवाशांना ऊन-पाऊस सहन करत रस्त्यावरच थांबून बसची वाट पहावी लागत आहे.

पूर्वीच्या मानाने आता चिचोंडी पाटील गावाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. गावातील नागरिकांना शेतीवाडी असल्याने तसेच वेगवेगळ्या कामासाठी नेहमी अहिल्यानगर (अहेमदनगर), पुणे, मुंबई यासारख्या महानगरांसोबतच बीड, उस्मानाबाद आताचे धाराशिव, सोलापूर, लातूर सारख्या जिल्ह्यातही याच रस्त्यावरून ये-जा करावी लागते. म्हणून चिचोंडी पाटील गावात एसटी बस स्थानक निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे.





याकरिता याच राज्यमार्गावर चिचोंडी पाटील गावाच्या हद्दीत असलेल्या आणि स्थलांतरित करण्यात आलेल्या शासकीय ग्रामीण रुग्णालयाच्या पूर्वीच्या जागी नवीन एसटी बस स्थानक निर्माण करण्यात यावे. सध्या त्या जागी पशुवैद्यकीय रुग्णालय सुरू असून एवढ्या मोठ्या जागेच्या मानाने तिथे उपचारासाठी तेवढ्या संख्येने जनावरं येत नाहीत. पशुवैद्यकीय रुग्णालय गावात कुठेही अन्य जागी स्थलांतरित केले जाऊ शकते. मोक्याच्या ठिकाणी राज्यमार्गावर असलेल्या येथील शासकीय जागी एसटी बस स्थानक निर्माण करण्यात यावे. ये-जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय टाळावी. जेणेकरून हिवाळा, उन्हाळा, पावसाळा कोणताही ऋतू असला तरी प्रवाशांना त्रास होणार नाही. जो सध्या प्रचंड मोठ्या प्रमाणात होतोय.

या जागेवर एसटी बस स्थानक निर्माण झाल्यानंतर गावातील सुशिक्षित तरुणांना विविध व्यवसाय करण्यास चालना मिळेल. ज्यामुळे रोजगार मिळण्याची संधी वाढेल आणि प्रवाशांची होणारी गैरसोयही टळेल म्हणून निवेदनाचा सारासार विचार करून या प्रश्नावर शासकीय-प्रशासकीय पातळीवर लवकरात लवकर कार्य करून बीड - अहिल्यानगर (अहेमदनगर) राज्यमार्गावर चिचोंडी पाटील येथे एसटी बस स्थानक निर्माण करावे आणि पशुवैद्यकीय रुग्णालय गावात इतरत्र हलवावे अशी मागणी एस.एम.युसूफ आणि रमेशराव गंगाधरे यांनी केली आहे.

# एसआयआर गणना फॉर्म भरण्यासाठी वार्ड क्र. १९, २०, २१ व २२ मध्ये विशेष कॅम्प

## नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : सभापती शेख निजाम यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील वार्ड क्रमांक १९, २०, २१ व २२ मधील नागरिकांना एसआयआर गणना फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुलभ व वेगवान व्हावी, तसेच एकाही पात्र मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळले जाऊ नये, या उद्देशाने जयहिंद कॅम्पस, मिलतनगर, बीड येथे शनिवार दि. ११ जुलै ते रविवार दि. १२ जुलै २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्पमध्ये नागरिकांना इडज च्या माध्यमातून डखठ गणना फॉर्म भरून घेण्याची, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून घेण्याची तसेच मतदार यादीसंदर्भातील विविध शंकांचे निरसन करून घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री नामदार सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या जनहिताच्या उपक्रमासाठी आमदार विजयसिंहराजे पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,



नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे, मुख्याधिकारी मांडुरके तसेच वार्ड क्रमांक १९, २०, २१ व २२ चे सर्व लोकप्रतिनिधी व नगरसेवक मार्गदर्शन व सहकार्य करीत असून, नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

याबाबत माहिती देताना स्वच्छता व आरोग्य सभापती तथा नगरसेवक शेख निजाम जैनुद्दीन यांनी सांगितले की, लोकशाही व्यवस्थेचा पाया मजबूत करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने ही जबाबदारी ओळखून वेळ न घालवता या विशेष कॅम्पचा लाभ घ्यावा. मतदार ओळखपत्र, आधार कार्ड व पासपोर्ट आकाराचा फोटो सोबत आणून आपला डखठ गणना फॉर्म भरावा. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत इडज व कॅम्पमधील कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रक्रिया पूर्ण करावी.

या उपक्रमामुळे वार्डातील हजारो नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध होणार असून, फॉर्म भरण्यासाठी होणारी धावपळ व वेळेचा अपव्यय टळणार आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त प्रयत्नातून राबविण्यात येणाऱ्या या विशेष कॅम्पला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम जैनुद्दीन, नगरसेवक सय्यद सादिक अली, बाळासाहेब गुंजाळ शेख खय्युम इनामदार, सय्यद इलियास, मनोज गोडसे, दत्ता जाधव, शेख रईस सर, यांनी केले आहे. तसेच प्रत्येक नागरिकाने आपल्या कुटुंबातील सदस्य, नातेवाईक आणि शेजाऱ्यांनाही या कॅम्पची माहिती देऊन त्यांनाही सहभागी करून घ्यावे, असेही त्यांनी नमूद केले. नागरिकांच्या सक्रिय सहभागातून हा उपक्रम यशस्वी होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# पत्रकारांना परवानगी देऊन नगरपरिषद सभा Live दाखवा : खुर्शीद आलम

## नगराध्यक्ष व मुख्याधिकारीकडे तुतारी गटाची मागणी

**बीड । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गटाच्या वतीने बीड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता पारवे मॅडम यांना निवेदन देण्यात आले यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब भाई उपस्थित होते, नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी साहेब यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की देशातील सर्वोच्च सभा म्हणजेच संसद भवन सभा व राज्यसभा आणि विधानपरिषद सभेचे live प्रसारण केले जाते आहे.

अगदी याच पार्श्र्वभूमीवर बीड नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा बीड शहरातील नागरिकांसाठी श्रळींश दाखवण्यात यावी म्हणजे बीड नगरपरिषद शहराच्या विकासासाठी आणि सर्वसामान नागरिकांसाठी नगरपरिषद काय निर्णय घेत आहेत आणि कोण कोणत्या योजना राबवत आहेत वगैरे याची माहिती सर्वसामान्य लोकांना मिळू शकेल. नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा श्रळींश दाखवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मिडिया, प्रेस मिडिया, सोशल मिडिया वगैरे यांना नगरपरिषद सभागृहात बसण्याची परवानगी देऊन त्यांना सभागृहात बसण्याची जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी तुतारी गटाच्या वतीने गटनेते खुर्शीद आलम यांनी केली आहे. या शिष्टमंडळात नगरसेवक अशोक काळे, नगरसेवक अय्युब खान पठाण, नगरसेवक अक्षय जाधव, नगरसेवक मसी भाई, नगरसेवक मोहसीन भाई, नगरसेवक रईस भाई आदी मान्यवर उपस्थित होते.

# खांबामधील विद्युत प्रवाहाने बैलाचा मृत्यू

## सहा जण वाचले, नाथापूर येथील घटना

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील नाथापूर शिवारात पेरणी करत असताना शेतामध्ये उभा केलेल्या खांबामध्ये विद्युत प्रवाह आल्याने एका बैलाचा मृत्यू झाला असून सहा जण बाल बाल वाचल्याची घटना दि. १ जुलै रोजी घडली आहे. दरम्यान सदरील शेतकऱ्याला महावितरणाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.



नाथापूर शिवारात कैलास भाऊसाहेब चव्हाण हे आपल्या शेतामध्ये पेरणी करत होते. उशिरा आलेल्या पावसाने जमिनीत ओल झाल्यामुळे या भागात सध्या पेरणीची लगबग सुरू आहे. अशा परिस्थितीत शेतकरी कैलास चव्हाण हे पेरणी करत होते पेरणी करत असताना शेतात महावितरणने उभा केलेल्या पोलमध्ये विद्युत प्रवाह उतरला होता. याची कल्पना नसताना या खांबा जवळून बैल आणि पेरणी करणारे जात असतानाच विद्युत खंबा मधील विद्युत प्रवाहाने बैलाला झटका बसला आणि बैल जागेवरच मृत्यू पावला मात्र हा प्रकार सदरील शेतकऱ्यांच्या लक्षात येतात जवळ असलेले नागरिक वाचले असून एका बैलाला वाचवण्यात सदरील शेतकऱ्याला यश आले आहे. हा बैल मृत्यू पावल्यामुळे या शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून जवळपास एक लाख रुपये किमतीचा हा बैल मरण पावल्याने परिसरातील शेतकऱ्यांतून हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान महावितरणच्या चुकीमुळे थांबा मध्ये विद्युत प्रवाह उतरला असून सदरील विद्युत प्रवाहने बैलाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे महावितरणने सदरील शेतकऱ्याला नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.

# संत मुक्ताई पालखी मार्गावरील अस्वच्छता व खड्डे तातडीने दुरुस्त करा!

## मुख्याधिकारी नगरपरिषद व जिल्हाधिकाऱ्यांकडे डॉ. गणेश ढवळे यांची निवेदनाद्वारे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

आदिशक्ती संत मुक्ताईंची पालखी उद्या बीड शहरात दाखल होत असून, पालखी मार्गावरील अस्वच्छता, कचऱ्याचे ढीग आणि ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे वारकरी व भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे पालखी मार्गाची तातडीने स्वच्छता करून रस्त्यांवरील खड्डे बुजवावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड आणि जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

आदिशक्ती संत मुक्ताईंची पालखी जालना रोडमार्गे बीड शहरात प्रवेश करते. त्यानंतर सुभाष रोड, माळवेस, धोंडीपुरा, बलभीम चौक आणि जुना बाजार मार्गे पुढील प्रवास करते. बीडमध्ये संत मुक्ताई आणि आजोबा गोविंदपंत यांची भेट होत असल्याने या पालखी सोहळ्याला विशेष धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व आहे. पालखीचा दोन दिवसांचा मुक्काम बीडमध्ये असतो.



मात्र यंदा पालखी मार्गावर अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पालखीच्या दर्शनासाठी हजारो वारकरी आणि भाविक शहरात येत असल्याने या परिस्थितीमुळे अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालखी आगमनापूर्वी संपूर्ण मार्गाची स्वच्छता, खड्ड्यांची दुरुस्ती आणि आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली आहे.

पालखीचा प्रमुख मार्ग जालना रोड फ सुभाष रोड फ माळवेस फ धोंडीपुरा फ बलभीम चौक फ जुना बाजार मार्गे आदिशक्ती संत मुक्ताई पालखी पुढील प्रवास करते.

याच मार्गावर सध्या मोठ्या प्रमाणात कचरा व रस्त्यांवरील खड्ड्यांची समस्या असल्याचे निदर्शनास आले आहे. डॉ. ढवळे यांची मागणी पालखी आगमनापूर्वी संपूर्ण मार्गाची विशेष स्वच्छता मोहीम राबवून रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावेत, प्रकाशव्यवस्था आणि इतर आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून वारकरी व भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शनाची व्यवस्था करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# महिलांसाठी स्वतंत्र जॉगिंग ट्रॅकसह अत्याधुनिक सार्वजनिक उद्यानाच्या उभारणीसाठी मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांकडे निवेदन; मागणीला सकारात्मक प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

एमआयडीसी, बीड येथील ओपन स्पेस क्रमांक १ (क्षेत्रफळ ६,५०० चौ.मी.) बीड नगर परिषदेकडे हस्तांतरित करून महिलांसाठी स्वतंत्र, सुरक्षित जॉगिंग ट्रॅकसह अत्याधुनिक सार्वजनिक उद्यान विकसित करण्यात यावे, तसेच या प्रकल्पासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, या मागणीचे सविस्तर निवेदन दि.९ जुलै रोजी मुंबई येथील विधान भवनात आमदार मा. विजयसिंहजी पंडित यांच्या माध्यमातून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. श्रीमती सुनेत्रा (वहिनी) अजितदादा पवार यांना नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य अमर मारुतीराव नाईकवाडे यांनी सादर केले.



निवेदनामध्ये एमआयडीसीतील सुमारे ६,५०० चौ.मी. क्षेत्रफळाचा ओपन स्पेस क्रमांक १ हा भूखंड गेल्या ४० ते ४५ वर्षांपासून पूर्णपणे दुर्लक्षित व पडीक अवस्थेत असून तेथे मोठ्या प्रमाणात कचरा, झुडपे व अस्वच्छता निर्माण झाल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर जागा बीड नगर परिषदेकडे हस्तांतरित करून त्याठिकाणी आकर्षक हरित क्षेत्र, वृक्षारोपण, मुलांसाठी खेळण्याची साधने, ज्येष्ठ नागरिकांसाठी विश्रांती व्यवस्था, खुली व्यायामशाळा, पादचारी मार्ग, आधुनिक प्रकाशयोजना, सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था आणि सर्व नागरिकांसाठी अत्याधुनिक सार्वजनिक उद्यान विकसित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, या उद्यानामध्ये महिलांसाठी स्वतंत्र, सुरक्षित व आधुनिक जॉगिंग ट्रॅक उभारण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. महिलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत सकाळी व सायंकाळी व्यायाम, चालणे व धावण्यासाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देणारा हा महाराष्ट्रातील एक आदर्श प्रकल्प ठरू शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, भूखंडाचे कायमस्वरूपी हस्तांतरण शक्य नसल्यास तो किमान ४० वर्षांच्या कालावधीसाठी नाममात्र भाडेदराने बीड नगर परिषदेला भाडेपट्ट्याने उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे शासनावर कोणताही अतिरिक्त देखभाल खर्च न येता नगर परिषदेमार्फत त्या जागेचा विकास, सुशोभीकरण व देखभाल प्रभावीपणे करता येईल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

यावेळी मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री मा. श्रीमती सुनेत्रा (वहिनी) अजितदादा पवार यांनी सदर प्रस्तावाची दखल घेत या लोकहिताच्या मागणीबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला व संबंधित विभागामार्फत प्रस्तावाचा योग्य विचार करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी बीड नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळक, गटनेते फारुख पटेल तसेच नगरसेवक अशपाक इनामदार उपस्थित होते. बीड शहरातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी, आरोग्य संवर्धनासाठी आणि नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लागावा, अशी अपेक्षा नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य अमर मारुतीराव नाईकवाडे यांनी व्यक्त केली.

# शिक्षकांच्या २० वर्षांच्या संघर्षाचा आज फैसला!

## टप्पा वाढीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत आज ११ वाजता महत्त्वपूर्ण बैठक!

**मुंबई । प्रतिनिधी**

विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या गेल्या दोन दशकांपासून प्रलंबित असलेल्या ' शंभर टक्के अनुदान' प्रश्नाला अखेर उद्या न्याय मिळण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या संदर्भात आज शुक्रवार (दि.१० जुलै) रोजी सकाळी ११:१० वाजता राज्याचे मुख्यमंत्री यांच्यासोबत एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अंतिम बैठक होणार आहे. या बैठकीत शिक्षकांच्या हक्काच्या टप्पा वाढीबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती आमदार विक्रम काळे यांनी दिली आहे. दुसरीकडे या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी आणि सरकारवर दबाव गट निर्माण करण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिक्षकांनी मुंबईच्या आझाद मैदानावर येण्यास सुरुवात केली आहे.

**'एक दिवसाचा त्याग आयुष्यभराचा सन्मान!' – खंडेराव जगदाळे**

उद्याचा दिवस आपल्या वीस वर्षांच्या प्रदीर्घ आणि खडतर संघर्षाला न्याय मिळवून देणारा आजचा दिवस ऐतिहासिक दिवस ठरू शकतो. या लढ्यातील अंतिम विजय डोळ्यांनी पाहण्यासाठी आणि या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी प्रत्येक शिक्षकाने कोणत्याही परिस्थितीत आझाद मैदानावर पोहोचले पाहिजे, असे आवाहन शिक्षक समन्वय समितीचे नेते खंडेराव जगदाळे यांनी केले. यावेळी पुढे बोलताना खंडेराव जगदाळे यांनी मिळेल त्या गाडीने मुंबईचे क्रांतिकारी आझाद मैदानात उपस्थित रहा अशी भावनिक साद जगदाळे यांनी घातली.



**शिक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता!**

आझाद मैदानावर नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आणि अस्वस्थता निर्माण झाली असून, आझाद मैदानावर गर्दी जमवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या निमित्ताने शिक्षक समन्वय संघाच्या वतीने शिक्षकांना तिकीट असो वा नसो: जनरल असो वा रिझर्वेशन, जी गाडी मिळेल त्या गाडीने तात्काळ मुंबईची वाट धरा. रात्रीची ट्रेन न मिळाल्यास, सकाळची 'वंदे भारत एक्सप्रेस' किंवा उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही वाहनाने मुंबई गाठा अशी भावनिक साद घालण्यात आली आहे.

**सरकार सकारात्मक, पण एकजूट दाखवण्याची वेळ!**

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री आणि सर्वपक्षीय आमदारांकडून यापूर्वीच शिक्षकांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन मिळाले आहे. मात्र, ऐन ऐनवेळी निर्णयावर शिक्कामोर्तब व्हावे यासाठी शिक्षकांची भक्कम उपस्थितीच या लढ्याची सर्वात मोठी ताकद ठरणार आहे. गेल्या २० वर्षांपासून अत्यंत तुटपुंज्या पगारावर काम करणाऱ्या हजारो शिक्षकांचे भवितव्य आजच्या बैठकीवर अवलंबून आहे. त्यामुळे उद्याचा 'एक दिवसाचा त्याग, आयुष्यभराचा सन्मान' ठरवणार का? याकडे आता संपूर्ण राज्यभरातील शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागून राहिले आहे.

# एसआयआरमध्ये सहभागी व्हा, लोकशाही मजबूत करा : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात निवडणूक आयोगामार्फत सुरू असलेल्या Special Intensive Revision म्हणजे SIR प्रक्रियेत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हा असे आव्हान सामाजिक कार्यकर्ता तथा पत्रकार शेख युनूस यांनी बीड च्या जनतेला आवाहन केले आहे.



पुढे ते म्हणाले की, मतदार यादीत नाव नसल्याने अनेकांना मतदानाचा हक्क बजावता येत नाही. एस आय आर ही संधी आहे. आणि आपण सर्वांनी मिळून बीड जिल्ह्याची मतदार यादी १००% शुद्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे. पुढे ते म्हणाले की, तरुणांनी, महिलांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपले नाव, पत्ता, वयाची माहिती तपासावी. काही चूक असल्यास त्वरित BOL किंवा voters.eci.gov.in या पोर्टलवर दुरुस्ती करावी. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येकाने नाव नोंदणी करणे बंधनकारक आहे. पुढे शेख युनूस यांनी नागरिकांना आव्हान केले की, आपण स्वतः सोबत कुटुंबातील आणि शेजाऱ्याची देखील नावे तपासावीत. एक जबाबदार नागरिक म्हणून ही आपली जबाबदारी आहे.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. *वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com